Estd : 1962
NAAC 'A' Grade
MHRD-NIRF-28th Rank
कार्यालय:०२३१-२६०९१७५/७६
फॅक्स :०२३१ -२६९१५३३
ई-मेल :dsw@unishivaji.ac.in

# शिवाजी विद्यापीठ
## राष्ट्रीय सेवा योजना
विद्यानगर, कोल्हापूर -४१६ ००४

प्रा.डॉ.डी.के.गायकवाड
कार्यक्रम समन्वयक

संदर्भ.जा.क्र./शिवाजी वि./रा.से.यो./ई–मेलद्वारे दि.19/11/2016

**अतितात्काळ – स्मरणपत्र :**

प्रति,
मा. प्राचार्य / प्राचार्या
राष्ट्रीय सेवा योजना,
सर्व संलग्न महाविद्यालये,

मा. अधिविभागप्रमुख,
राष्ट्रीय सेवा योजना संलग्न अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**लक्षवेध : राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी**

**विषय** : रासेयो विद्यार्थी नोंदणीबाबतची तसेच कार्यक्रम अधिकारी यांची 2016–17 ची सविस्तर माहिती पाठविणेबाबत...

**संदर्भ** : क्रमांकः रासेयो 2016/प्र.क्र.153/16/साशि 7 उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय कक्ष, मुंबई यांचेद्वारे प्राप्त दिनांक 18 ऑक्टोबर, 2016 रोजीचे पत्र...

मा. महोदय / महोदया,

वरील विषय व संदर्भानुसार नवी दिल्ली येथे संपन्न झालेल्या बैठकीतील चर्चेनुसार शिवाजी विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजनाद्वारे राष्ट्रीय सेवा योजना प्रवेशित विद्यार्थ्यांची यादी का देऊ शकत नाही, याबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आलेले आहे. याबाबत माननीय पंतप्रधान कार्यालयाने राष्ट्रीय सेवा योजना प्रवेशित विद्यार्थ्यांची यादी तात्काळ सादर करणेबाबत अंतिम निर्देश दिलेले आहेत.

तरी **आपल्या महाविद्यालय, अधिविभाग मधील सन 2016–17 ची राष्ट्रीय सेवा योजना प्रवेशित विद्यार्थ्यांची यादी खालीलप्रमाणे विहीत नमून्यामध्ये सविस्तर संपुर्ण माहिती भरून ( सदर फॉरमेटमध्ये कोणताही बदल न करता खालीलप्रमाणे एकूण 7 कॉलम असलेली excel file ) दिनांक 22/11/2016 रोजी मध्यान्ह पूर्वी पर्यंत** तात्काळ **nss@unishivaji.ac.in** या ई–मेल आयडीवर प्राधान्याने पाठविण्यात यावी.

| Sr. | State | Name of Volunteer | College / Institution | Name of University | Contact No. (Mobile) | Email id |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |

सदर माहिती देताना प्रत्येक विद्यार्थ्यांचा मोबाईल क्रमांक व ई–मेल आयडी असणे अनिवार्य आहे. अन्यथा ज्या विद्यार्थ्यांचे नाव, मोबाईल क्रमांक व ईमेल–आयडी प्राप्त होतील, तेवढीच संख्या ग्रहीत धरण्यात येईल. तसेच ज्या महाविद्यालय, अधिविभागाद्वारे सदरची माहिती यापूर्वी विहीत वेळेत सादर करण्यात आलेली आहे याव्यतिरीक्त **ज्या – ज्या महाविद्यालय, अधिविभागाद्वारे सदरची माहिती अद्याप सादर करण्यात आलेली नाही त्यांची विद्यार्थीसंख्या रद्द करण्यात येवून सदरचे राष्ट्रीय सेवा योजना एकक बंद करणेत येईल व कोणतेही अनुदान वितरीत करण्यात येणार नाही आणि याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित महाविद्यालय, अधिविभाग यांची असेल.**

कळावे,

आपला विश्वासू

(प्रा.डॉ. डी. के. गायकवाड)
कार्यक्रम समन्वयक

MISSION 2015-16\CIRCULAR - NSS Letter Head--Pg 560